महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

# पक्षिमित्र



▪ वर्ष – तेरावे ▪ अंक २ रा ▪ संपादक : दिगंबर गाडगीळ ▪ १ जानेवारी २०२३ ▪ पाने –२४



## क्षणचित्रे



अकोला जिल्हा पत्रकार संघ,अकोला वन विभाग व निसर्ग कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने पक्षी परिचय व पक्षी संवर्धन जनजागृती कार्यशाळा


सृष्टी वैभव, आधार फाऊंडेशन व वनविभाग अकोला यांच्या सौजन्याने पक्षीसप्ताह अंतर्गत विद्यार्थ्यांचे पक्षी निरीक्षण


नाशिक येथे संपन्न झालेल्या पहिले विद्यार्थी पक्षीमित्र संमेलनाचे बोलकी छायाचित्र



वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था,अमरावती तर्फे आयोजित पक्षीसप्ताह मध्ये पक्षीनिरीक्षण मोहिमेत आपला सहभाग देतांना अंधजन व निसर्गप्रेमी



बहार नेचर फाऊंडेशन वर्धा तर्फे आयोजित पक्षिसप्ताह मधील पाखरं प्रेमींचा उत्सव


अश्विन पाटील यांचे शालेय विद्यार्थ्यांच्यासाठी पक्षी सप्ताह दरम्यान पक्षिनिरीक्षण व  निसर्ग भ्रमंती कार्यक्रमाचे प्रत्यक्ष क्षण.

## संपादक

**श्री.दिगंबर गाडगीळ**

३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५

स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

## सहाय्यक संपादक

**श्री. किरण मोरे,**अमरावती, मो. ९९२३९१००३४

Email: kiranmorey1983@gmail.com

**डॉ. अनिल माळी,** नासिक, मो. ९८५०८१८६४४

Email: anilrmali@yahoo.co.in

## कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | **डॉ. जयंत वडतकर,** अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | – | **डॉ. राजू कसंबे,** ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | – | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे,** अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | – | **प्रा. डॉ. गजानन वाघ,** अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | – | **श्री. शरद आपटे,** सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | – | **डॉ. अनिल माळी,** नासिक<br>**मो. ९८५०८१८६४४** |
| सदस्य | – | **प्रा. डॉ. निनाद शाह,** सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | – | **श्री. किशोर गठडी,** औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | – | **श्री. दिलीप विरखडे** (वर्धा)<br>**मो. ७७७५८८३८६१** |
| सदस्य | – | **श्री. अविनाश कुबल** (ठाणे)<br>**मो. ९३२४२३८०३१** |
| सदस्य | – | **कु. रूपाली मढवी** (मुंबई)<br>**मो. ९८६९५५९९२२** |

## सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगंबर गाडगीळ | (नाशिक) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


# संपादकीय

## पक्षी सप्ताह




**दिगंबर गाडगीळ**

संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक

dgadgil09@gmail.com


आपल्या संघटनेने ५ नोव्हेंबर (मारुती चित्तमपल्ली जन्मदिन) ते १२ नोव्हेंबर (डॉ. सालीम अली जन्मदिन) असा पक्षी सप्ताह साजरा करण्याची हाक २०१७ मध्ये दिली. वास्तविक १ ते ७ ऑक्टोबर हा जागतिक वन्य प्राणी सप्ताह साजरा होत असताना लगेच पक्षी सप्ताह कसा साजरा होईल, अशी शंका येत असताना तो चांगल्या पद्धतीने साजरा झाल्याच्या बातम्या आल्यावर थोडे हायसे वाटले. वन्य प्राणी पाहण्यासाठी जंगलात जावे लागते; पण पक्षी अगदी अंगणातही पाहता येतात म्हणून पक्षी सप्ताह अधिक उत्साहाने साजरा होत असावा.

संघटनेच्या विनंतीवरून महाराष्ट्र शासनानेही ही कल्पना उचलून धरली व शासकीय पातळीवरून २०२० सालापासून पक्षी सप्ताह साजरा होऊ लागला. शासकीय आदेशानुसार कार्यक्रम कसे साजरे होतात याची कल्पना असताना पक्षी सप्ताहाबद्दल मात्र तसा अनुभव आला नाही, ही आनंदाची गोष्ट आहे. या वर्षीच्या पक्षी सप्ताहात अनेक ठिकाणी अभिनव कार्यक्रम घडले. याची दखल स्थानिक वृत्तपत्रांनी घेतली. यावरून पक्षी हा सार्वधिक प्रेमाचा विषय आहे, हे जाणवले.

केवळ महाराष्ट्र हे असे राज्य आहे की, जिथे राज्य पातळीवर पक्षी मित्र संमेलन होते. अगदी नियमाने त्याला आता विभागीय संमेलने, जिल्हा संमेलने, इतकेच काय विद्यार्थी संमेलने असे घुमारे फुटले आहेत. इतर राज्यातून निदान राज्य पातळीवर संमेलन व्हावे, यासाठी नांदूर मध्यमेश्वरला जे संमेलन झाले त्यात शेजारच्या गुजरात राज्यातील पक्षीतज्ञाला आम्ही उद्घाटनासाठी बोलावून प्रयत्न केला होता; पण त्याला यश आले नाही.

आता पक्षी मित्र चळवळ अगदी शालेय पातळीपर्यंत पोहोचू पाहत आहे, ही समाधानाची बाब आहे.

*****


मुखपृष्ठ छायाचित्र – निनाद अभंग, पुणे   रेड क्रेस्टेड पोचार्ड – गणेश गोरे

# ❊ अध्यक्षीय ❊



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

भारतीय पक्षिविश्व व पक्षिअभ्यासशास्त्रास जागतिक स्तरावर पोहोचवणारे पै. डॉ. सालिम अली व महाराष्ट्रातील तमाम पक्षिनिरीक्षकांसाठी कायम आदरस्थानी असलेले ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व आदरणीय मारुती चितमपल्ली या दोहोंच्या जन्मदिवसानिमित्ताने महाराष्ट्र पक्षीमित्रकडून २०१७ पासून सुरु केलेला पक्षी सप्ताह या वर्षी संपूर्ण राज्यात मोठ्या उत्साहात साजरा झाला. आपल्याला माहीत आहेच की, महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे सुरू करण्यात आलेल्या या पक्षी सप्ताहास राज्य शासनातर्फे मान्यता मिळावी यासाठी पक्षिमित्रांतर्फे केलेल्या मागणीस शासनाने २०२० साली मान्यता दिली आणि तेव्हापासून हा सप्ताह शासन स्तरावरसुद्धा साजरा केला जातो. आदरणीय मारुती चितमपल्ली यांचा जन्मदिन दिनांक ०५ नोव्हेंबरपासून ते पै. डॉ. सालिम अली यांची जयंती दिनांक १२ नोव्हेंबर पर्यंत राज्यात पक्षी सप्ताह उत्साहात साजरा झाला. महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेकडून ठिकठिकाणी पक्षी सप्ताहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दि. १२ नोव्हेंबरला डॉ. सालिम अली यांचे जयंती दिनी या सप्ताहाचा समारोप अमरावती येथे एका अनोख्या उपक्रमाने साजरा करण्यात आला. महाराष्ट्र पक्षीमित्र, वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती यांचे कडून आणि अमरावती वन विभाग, वडाळी रेंज यांच्या सहकार्याने अमरावती येथील बांबू गार्डन येथे, एक प्रयास: दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरीक्षण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दृष्टिहीन व्यक्तींना सुंदर, अनोखे पक्षी बघता येत नाहीत, त्यामुळे त्यांनीसुद्धा ते अनुभवावेत, त्यांचे आवाज ऐकून त्यांची ओळख करून घ्यावी, त्यांच्याविषयी माहिती जाणून घ्यावी या उद्देशाने, या पक्षी सप्ताहाच्या समारोपीय दिवशी दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अनोख्या उपक्रमाची राज्यभरात अनेकांनी दखल घेऊन विशेष कौतुक केले. अशा प्रकारचे कार्यक्रम भविष्यात महाराष्ट्र पक्षीमित्रचे सभासद अनेक ठिकाणी राबवतील अशी आशा आहे.

आपल्याला माहीत आहे की, विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन हा उपक्रम सर्वप्रथम अकोला येथे निसर्ग कट्टा यांचेकडून सुरु करण्यात आला होता. या वर्षी डिसेंबर महिन्यात अकोला येथे सातवे विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन पार पडले. शालेय विद्यार्थ्यांमध्ये पक्षी निरीक्षण या छंदाबद्दल आवड निर्माण करण्यासाठी व त्या माध्यमातून पक्षी व पर्यावरण संर्वधनाची दिशा दाखविण्यासाठी जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) अकोला, निसर्गकट्टा, अकोला वन विभाग व महाराष्ट्र पक्षीमित्र यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी १० डिसेंबर २०२२ ला माऊंट कारमेल हायस्कूल येथे सदर संमेलन पार पडले. यामध्ये शालेय शिक्षण विभागाने पुढाकार घेऊन संपूर्ण जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना यामध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे यावर्षीचे संमेलन हे खऱ्या अर्थाने शालेय पक्षिमित्र संमेलन ठरले. भविष्यात संपूर्ण राज्यात शालेय शिक्षण विभागाच्या मदतीने अशी संमेलने आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना पुढाकार घेईल, त्यासाठी संपूर्ण पक्षिमित्रांचे सहकार्य लाभेल आणि हा कार्यक्रम प्रत्यक्षात राज्यभर संपन्न होईल, अशी आशा नव्हे तर प्रयत्न करू या.

महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे देण्यात येणाऱ्या २०२२ च्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, यावर्षीचा पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार सोलापूर येथील श्री. भीमाशंकर शा. कुलकर्णी यांना जाहीर करण्यात आला. इतर पुरस्कारांमधे पक्षी संशोधन पुरस्कार नांदेड येथील प्रा. डॉ. जयवर्धन विठ्ठलराव बलखंडे यांना, पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार सोलापूर येथील श्री. राजकुमार जगदीश कोळी यांना तर पक्षी जनजागृती पुरस्कार गडहिंग्लज येथील श्री अनंत बाबू पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे. पक्षी सबंधित विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे २०१९ पासून या पुरस्कारांची सुरुवात करण्यात आली असून यामध्ये दरवर्षी चार पुरस्कार देण्यात येत असतात. या पुरस्कारांचे वितरण येत्या ३५ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात करण्यात येणार आहे. सर्व पुरस्कार विजेत्यांचे महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे हार्दिक अभिनंदन!

ठाणे येथील हियर ऑन प्रोजेक्ट एनव्हार्नमेंट अर्थात होप नेचर ट्रस्ट (HOPE) या संस्थेतर्फे प्रायोजित महाराष्ट्र पक्षीमित्रकडून नवोदित पक्षिमित्रांना दरवर्षी दोन पुरस्कार दिले जात असतात. नवीन पक्षी निरीक्षक व पक्षी अभ्यासक घडावेत यासाठी, पक्षी अभ्यासात रुची दाखविणारे, शाळा महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी यांना प्रोत्साहन देण्यासाठी होप या संस्थेकडून उदयोन्मुख पक्षी निरीक्षक व उदयोन्मुख पक्षिमित्र असे दोन पुरस्कार दरवर्षी दिले जात असतात. या

पुरस्कारासाठी महाराष्ट्र पक्षीमित्रकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यामधून पक्षी निरीक्षण व पक्षी अभ्यास या क्षेत्रात नव्याने सुरुवात करून उत्कृष्ट कार्य करून आदर्श निर्माण करणाऱ्या तरुण पक्षी निरीक्षकांची निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे यावर्षी यामध्ये मुलींनी बाजी मारलेली आहे. यावर्षीचा उदयोन्मुख पक्षी निरीक्षक पुरस्कार भुसे, निफाड (जिल्हा नाशिक) येथील कु. अमृता गंगाधर आघाव हीस, तर उदयोन्मुख पक्षिमित्र पुरस्कार सेंदूरवाफा (तालुका साकोली, जिल्हा भंडारा) येथील कु. यशश्री यशवंत उपरीकर हीस जाहीर करण्यात आला आहे. दोघींचेही महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे हार्दिक अभिनंदन.

या वर्षीचे ३५ वे राज्यस्तरीय महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन चंद्रपूर येथे फेब्रुवारी २०२३ मध्ये होणार आहे. जी-२० बैठकीच्या चंद्रपुरातील आयोजनाच्या शक्यतेमुळे चंद्रपूर येथील संमेलनाच्या तारखांची घोषणा लांबणीवर पडली होती. मात्र आता संमेलनाचे स्थळ व तारीख निश्चित झाली असून नोंदणीसुद्धा सुरू झाली आहे. महाराष्ट्रातील तसेच राज्याच्या बाहेरूनसुद्धा काही पक्षिमित्र या संमेलनास हजेरी लावणार आहेत. विविध दुर्मीळ पक्ष्यांचा अधिवास असलेला चंद्रपूर जिल्हा आणि जवळपासच्या ठिकाणांचे पक्षी निरीक्षकांसाठी नेहमीच आकर्षण असते. या निमित्ताने अनेकांना या ठिकाणी भेटी देण्याचा योग येणार आहे. तेव्हा लवकरच भेटू या चंद्रपुरात.

यावर्षी पासून आपल्या पक्षिमित्र अंकाचे स्वरूप थोडे बदलवून आकर्षक करण्याचा प्रयत्न केला ला आहे. या अंकापासून आपल्या पक्षिमित्र चे मुखपृष्ठ रंगीत होत आहे. त्यासाठी खर्च थोडा वाढणार असून तो भरुन काढण्यासाठी एक दोन जाहीराती मिळवाव्या लागतील. त्यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. नविन अंकाचे स्वागत करु या.

स्थलांतरित पक्षांच्या आगमना सोबतच नवीन वर्षाचे आगमन झाले आहे. नविन वर्षाचे सुद्धा स्वागत करु या! सर्वाना नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !!

धन्यवाद!

*****

# नाशिक शहरातील पहिले विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन संपन्न

दिनांक २४ सप्टेंबर २०२२ रोजी रचना स्कूल, नाशिक येथे शहरातील पहिले पक्षिमित्र संमेलन उत्साहात संपन्न झाले. यामध्ये सात शाळांचे एकूण ६० विद्यार्थी व १० शिक्षक, व २० पक्षीमित्र सहभागी झाले होते. संमेलनाचे आयोजन उत्तर महाराष्ट्र पक्षिमित्र मंडळ, नाशिक यांनी केले होते.

संमेलनाच्या उदघाटनप्रसंगी पक्षिमित्र मा. दिगंबर गाडगीळ, श्री. शांताराम आहेर, श्री. मधुकर जगताप, डॉ. अनिल माळी, रवी वामनाचार्य आदी यावेळी उपस्थित होते. संमेलन उद्घाटक श्री. दिगंबर गाडगीळ यांनी पक्षी निरीक्षण छंद जोपासावा व पक्षी संरक्षणासाठी हातभार लावावा, असे आवाहन केले.

संमेलनातील मार्गदर्शनामध्ये पक्ष्यांचे पर्यावरणातील स्थान-डॉ. अरुणा पाटील, पोस्टाच्या तिकिटावरील पक्षी - श्री. रवी वामनाचार्य, नाशिक शहरातील पक्षी- मधुकर जगताप,



# 'बोल्साचिका' एक सुनियोजित आणि पुनर्स्थापित पाणपक्षी अधिवास



**अनिल कुंटे**
9820245470
anilkunte@yahoo.co.in

मला अमेरिकेतील कॅलिफोर्निया मधील प्रशांत महासागर किनारपट्टीवरून जाणाऱ्या 'कोस्टल फ्री-वे' वरील 'बोल्साचिका' पाणथळ भागाला भेट देण्याची संधी मिळाली. हा एक व्यवस्थित, पुनर्स्थापित आणि सुनियोजित पाणपक्ष्यांचा अधिवास आहे.

कार-पार्किंगवरूनच खाडीपलीकडे एका लाकडी पुलावरून जाता येते. पुलावरच ही पाणथळ जागा पुनर्स्थापित करण्याकरता, तेथील स्थानिक पक्षिमित्रांनी दिलेल्या लढ्याची माहिती देणारा फलक आहे. ही पाणथळ जागा एक शतकाहून अधिक काळ समुद्राच्या भरतीच्या प्रवाहापासून रोखली गेली होती. परंतु आता धरणे तोडल्यामुळे, येथे परत प्रशांत महासागरातून ताजे भरतीचे पाणी मिळू लागले आहे.

१८९९ पूर्वी ही एक भरभराटीची नैसर्गिक पाणथळ जमीन होती. उत्तरेकडील आलास्काहून, दक्षिण अमेरिका खंडात, प्रशांत



महासागराच्या किनाऱ्यावरून जाणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांचा पण हा एक थांबण्याचा मुख्य अधिवास होता.

येथे भरतीचे आत येणारे पाणी आतील ताज्या पाण्यात मिसळल्यामुळे प्रत्येक वेळेला समुद्रातून पक्ष्यांकरता नवीन खाद्य येत होते. पण १८९९ मध्ये ही परिस्थिती बदलली. ताज्या पाण्याच्या दलदलीचा विस्तार करण्यासाठी समुद्राच्या भरतीचे खारे पाणी अडवले गेले. त्याकरता 'द गन क्लब'द्वारे दगड-मातीचा भराव घालून धरणे बांधली गेली आणि भरतीच्या पाण्यापासून हा पाणथळ भाग वंचित झाला. त्यामुळे बोल्साचिकाच्या खाऱ्या पाण्याच्या दलदलीमधील नैसर्गिक विविधता आणि वन्यजीवन कमी झाले.

पण हे तेथील स्थानिक पक्षिमित्र आणि राज्य संस्थांच्या काही वर्षांनी लक्षात आले. आणि जीर्णोद्धाराचे काम सुरू झाले. १९७० साली पहिले धरण तोडण्यात आले आणि समुद्राच्या भरतीचे पाणी थोड्या प्रमाणात आत येऊ लागले. जवळ जवळ तीस वर्षांनी २००४ मध्ये महासागरातील खाऱ्या पाण्याला होणारा अडथळा पण तोडण्यात आला. त्यामुळे शतकाहून अधिक काळानंतर खाऱ्या पाण्याची जैविक विविधता पुन्हा स्थापित झाली. आणि पाणपक्ष्यांसह सागरी वनस्पतींची पण भरभराट होऊ लागली. हे जीर्णोद्धाराचे काम २००६ मध्ये विविध टप्प्यात पूर्ण झाले.

२००४ मध्ये हे काम व्यवस्थित नियोजन करून सुरू करण्यात आले.. भरतीचा प्रवाह सुरळीत करण्यासाठी त्याला रोखणारा ७,५०,००० घन यार्डचा वाळूचा गाळ काढण्यात आला आणि त्याचबरोबर काठावरील १,८०,००० घन यार्डची खडक-मातीही खोदून काढून बाहेर टाकली गेली. पक्षी निरीक्षण आणि देखभाल करता काही जेटी बांधल्या गेल्या.



तयार करण्यात आलेले आहेत. म्हणून पक्षी जवळून पण बघता येतात.

आता हा पाणथळ भाग 'स्टेट इकॉलॉजिकल रिझर्व' म्हणून ओळखला जातो. या पाणथळीची माहिती देण्याकरता, एक माहिती केंद्र उभारण्यात आले आहे. तेथे दिसणाऱ्या पक्ष्यांचे लॉगबुक पण पाहायला मिळते. त्यात येणाऱ्या विविध पक्ष्यांची नोंद पण केली जाते. तेथील सर्व व्यवस्था जास्त करून पक्षिमित्र स्वयंसेवकांकडून बघितली जाते. ठिकठिकाणी त्या भागातील पक्ष्यांचे चित्रांसकट नावे असणारे फलक आहेत. त्याचबरोबर त्या जागेचे नकाशे आणि पक्षी बघायला येणाऱ्यांकरिता सूचनाफलक आहेत. पक्षी निरीक्षणाकरता काही स्पष्ट सूचनाही देण्यात आलेल्या आहेत. तेथे ठरवून दिलेल्या वाटांवरूनच जावे लागते. पाणथळीच्या पलीकडे जाण्यासाठी काही लाकडी पूल तयार करण्यात आलेले आहेत. म्हणून पक्षी जवळून पण बघता येतात.

एक मोठा परिसर पाणपक्ष्यांना काठावर घरटी करण्याकरता राखून ठेवला आहे. त्या भोवती लांबून बघण्यासाठी जाळ्या लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे पक्ष्यांना तेथे सुरक्षित वाटते. अमेरिकेत निसर्गप्रेमी लोकांची मोठी सशक्त लॉबी आहे. त्यामुळेच तेथील पक्षी अधिवास सुस्थितीत आहेत.

पण आपल्याकडे मात्र अशा प्रकारची मुंबईजवळची उरण पांजे पाणथळ जागा, काही उद्योगपती गिळंकृत करत आहेत. त्याविरुद्ध असणारा निसर्गप्रेमींचा लढा उद्योगपती आणि राजकीय लोकांकडून दाबला जात आहे, ही आपल्याकडची शोकांतिका आहे.

*****

# रानपिंगळा कसा ओळखावा?

सरासरी २३ सेंटीमीटर लांबी असलेला, रानपिंगळा याची छाती पांढरी असून त्यावर कथ्या रंगाचे आडवे पट्टे तसेच कपाळावर धूसर ठिपके असतात. रानपिंगळ्याचा रंग हा वाळलेल्या सागाच्या झाडाशी मिळता जुळता असल्या कारणाने त्याला कधी कधी शोधणे अवघड असते.

**खाद्य :–** रानपिंगळ्याचे मुख्य खाद्य हे लहान सस्तन प्राणी असून त्याच्यात प्रामुख्याने उंदीर वर्गीय प्राण्यांचा समावेश होतो. तसेच पाली आणि इतर कीटकांचा पण तो फडशा पाडतो.

**प्रजनन :–** रानपिंगळा या पक्ष्याच्या विणीचा हंगाम हा ऑक्टोबर ते मार्च आहे. साधारणत: ३० दिवसांत मादी १ ते ४ अंडी देते. या काळात मादी घरट्यातच असते. नर, मादीला खाद्य आणून देतो. पिले अंड्यातून बाहेर आल्यावर नर आणि मादी मिळून पिलांचे संगोपन करतात. साधारण ६० ते ७० दिवसांनी पिले मोठी होऊन उडण्यास सुरुवात करतात.

**घरटे :–** रानपिंगळा या घुबडाचे घरटे नेहमी सागाच्या झाडावर आढळून आले आहे. साधारण जमिनीपासून २० मीटर उंचीवर सागवानाच्या खोडात अंडाकृती आकाराचे घरटे असते. रानपिंगळा स्वत: घरटे बनवत नसून दुसऱ्या पक्ष्यांनी बनवलेल्या घरट्यात ते विण घालतात. प्रामुख्याने सुतारपक्षी आणि पोपट या पक्ष्यांची घरटी ते वापरतात, घरट्यावरून त्यांच्यात कधीकधी भांडणे ही होतात.

**रानपिंगळा बघण्याची योग्यवेळ :–** रानपिंगळा हे जरी दिवसा दिसणारे घुबड असले तरी दिवसभरात ते फक्त सकाळी आणि सायंकाळी (साधारणत: सकाळी ६ ते १० आणि सायंकाळी ४ ते ६) या वेळी जास्त कार्यशील असते. दुपारच्या वेळेस ते इतके कार्यशील नसते. ऊन वाढल्यावर तो झाडाच्या फांद्याच्या आडोश्याला असतो.



*****

# उरण एक लोप पावलेला स्वर्ग



**श्री. नंदकुमार वामन पवार,**
(मच्छिमार नेता, पर्यावरण कार्यकर्ता,
श्री एकवीरा आई प्रतिष्ठान, मुंबई)
9819831683
mangrovewarrior@gmail.com

उरण... अर्थात महाराष्ट्रातील सर्वांत मोठे किनारपट्टी भागावर वसलेलं पाणथळ. जैवविविधतेने परिपूर्ण असे हे पाणथळ शेकडो प्रकाराच्या स्थलांतरित व पाणपक्ष्यांचा अधिवास, अतिशय समृद्ध असे खाजण क्षेत्र. 'बीएनएचएस'च्या अभ्यासानुसार उरण तालुक्यातील पाणथळीवर दीडशेच्या आसपास वेगवेगळ्या प्रजातींच्या पक्ष्यांचे वास्तव्य आहे. त्यात पाणजे येथील पाणथळ क्षेत्रात पाच लाख स्थलांतरित पक्ष्यांचा अधिवास असल्याचे त्यांनी नमूद केले आहे त्यात अनेक प्रकारच्या दुर्मीळ, संकटग्रस्त, नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या स्तलांतरित पक्ष्यांचा अधिवास असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आलेले आहे. त्यात प्रामुख्याने फ्लेमिंगो, बदकांच्या विविध प्रजाती व इतर. अनेकवेळा वेगवेगळे स्थलांतरित पक्षी पाणजे येथील पाणथळ क्षेत्रात लांबच्या प्रवासात थकून आल्यानंतर तात्पुरता आश्रय (stopover destination) घेऊन ताजेतवाने होऊन पुढील प्रवास सुरू करतात.

पाणजे : डोंगरी येथील पाणथळ का संरक्षित करावे ?

१) पाणजे : डोंगरी हे पाणथळ २८९ हेक्टरवर वसलेले उपजत खाजण क्षेत्र व नैसर्गिक सखलभाग यासंदर्भात अलीकडेच उरण बायपास रोड केस संदर्भात सिडकोने माननीय मुंबई उच्च न्यायालयात हे क्षेत्र मासेमारी क्षेत्र असल्याचे अधोरेखित करत नकाशे सादर केलेले आहेत. हे वास्तव सिडकोने यापूर्वी कधीच मान्य केले नाही की संपूर्ण उरण तालुक्यात पाणथळ क्षेत्रे अस्तित्वात आहेत.

२) सदरचे क्षेत्र हे द्रोणगिरी नोडसाठी (२७४० हेक्टर) पूरनियंत्रण क्षेत्र (holding ponds) म्हणून सिडकोने आरक्षित केलेले आहे. द्रोणगिरी नोडमध्ये होऊ घातलेला विकास जो संपूर्ण नोड हा भरतीरेषेच्या तीन मीटर खाली वसलेला आहे. या नोडमध्ये विकास करीत असताना ३.५ ते ४ मीटरपर्यंत भराव करावा लागेल, असे सिडकोचे व्यवस्थापकीय तज्ञ दावा करत आहेत. अशा परिस्थितीत पूरनियंत्रण क्षेत्र असण्याचे महत्त्व अधोरेखित होते. अत्यंत गंभीर बाब म्हणजे सिडकोने २४४ हेक्टर धारण तलाव (flood mitigation areas, holding ponds) विकासाच्या नावाखाली विकलेले आहेत.

३) 'बीएनएचएस'नुसार पाणजे डोंगरी येथील पाणथळ हे पाच लाख स्थलांतरित पक्ष्यांचा अधिवास त्याचबरोबरीने शेजारी पनवेल तालुक्यात होऊ घातलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ज्यामुळे तेथील भरावामुळे विस्थापित होणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांना एक सक्षम पर्यायी अधिवास म्हणून 'बीएनएचएस'ने केलेली शिफारस.

४) पाणजे - डोंगरी येथील पाणथळ क्षेत्र हे अपवादात्मक, दुर्मीळ असे जैवविवधतेने नटलेले एकमेव किनारी पाणथळ क्षेत्र आहे जिथे स्थलांतरित पक्ष्यांना भरपूर खाद्य उपलब्ध आहे. अनेक पक्षी सदर पाणथळ क्षेत्रात दरवर्षी नियमित येत असतात. अनेक पक्षी येथे प्रजननदेखील करतात असे निरीक्षणात आले आहे.

उरण तालुका म्हणजेच समृद्ध असे खाजण क्षेत्र. या तालुक्यात साधरण चौसष्ठ गावे आहेत व येथे पारंपरिक पद्धतीने खाड्यांमध्ये, कांदळवनात मासेमारी चालत आलेली आहे. हे खाजणक्षेत्र म्हणजे स्थानिक भूमिपुत्रांसाठी उदरनिर्वाहाचे प्रमुख स्रोत होय.

वरीलपैकी सर्व पर्यावरण विषयक महत्त्व पायदळी तुडवत सिडकोने हे संपूर्ण संवेदनशील पाणथळक्षेत्र, पाणजे - डोंगरी धरून १२५० हेक्टर खाजण भाग हा 'रिलायन्स सेझ'साठी देऊ केला, एक कोटी सहा लाख रुपये प्रति हेक्टरी या दराने. २००६ साली या संपूर्ण क्षेत्राभोवती अनधिकृतपणे विनापरवाना सिडकोने आठ फूट उंच सिमेंट कॉंक्रिटच्या भिंती बांधून व त्यावर लोखंडी झाकणे बसून नैसर्गिक भरतीच्या पाण्याचे स्रोत बंद करण्यात आले. सदर नैसर्गिक भरती प्रक्रियेतील अडथळे दूर करावे यासाठी २०१३ साली MCZMA ने स्थानिक तहसीलदार यांना निर्देशित केले होते तसेच निर्देष पर्यावरण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले होते. परंतु, त्यावर आजतागायत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

सिडको अर्थात शहर विकास प्राधिकरण (Town development authority) जिची स्थापना १९७१ साली झाली सर्व नवी मुंबई व उरण तालुका त्यात समाविष्ट आहे. नवी मुंबई व उरण तालुक्यातील बहुतांश भाग हा सखल भाग, भरती-ओहोटी रेषेच्या प्रभावाखाली मोडणारा प्रदेश असल्यामुळे भरती ओहोटीच्या पाण्याचे नियोजन करणे क्रमप्राप्त व महत्त्वाचे ठरते.

सिडकोने सरसकट सर्वच नैसर्गिक भरती ओहोटीच्या पाण्याचे मार्ग सिमेंट कॉंक्रिटच्या भिंती बांधून व त्यावर लोखंडी झाकणे बसवून बंद केलेले आहेत जेणे करून भरतीचे पाणी आत खाड्यामध्ये येऊ शकत

नाही त्याचबरोबर धारण तलावात साठलेले पावसाचे पाणी (storm water) ओहोटीच्या वेळी स्लुईस (flap) गेटांची झाकणे आत साठलेल्या पाण्याच्या दाबावामुळे स्वयंचलित पद्धतीने उघडून पाणी समुद्राला जाऊन मिळते (Dutch technology) अशा प्रकारच्या व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत.

या मागचा एकच उद्देश आणि तो म्हणजे खाजण क्षेत्रे सुकवून, कांदळवनांवर भरावं घालून त्या जमिनी वेगवेगळ्या प्रकल्प धारकांना, बांधकाम व्यावसायिक व विकासकांना विकून नफा कमाविणे व याची खरी सुरूवात सन २००६ पासूनच झाली.सिडकोने अनेक प्रकल्पधारकांना बांधकाम व्यवसायिक जसे JNPT, ONGC, RELIANCE SEZ, JNPT SEZ, MSEB, BPCL, HPCL Etc यांना खाण जमिनी व स्थलांतरित पक्ष्यांचे अधिवास विकत दिले गेले. या सर्व घटकांनी कुठल्याही अस्तित्वात असलेल्या पर्यावरण विषयक कायद्यांची तमा न बाळगता स्थानिक लोकप्रतिनिधी, राजकीय नेते मंडळी, प्रशासकीय यंत्रणा यांना हाताशी धरून हजारों हेक्टर पर्यावरण संवेदनशील अधिवासावर (intertidal fishing zones) भराव घालून ते कायमस्वरूपी नेस्तनाबूत केले. प्रामुख्याने, उपजत खाजण क्षेत्रे नष्ट करण्यात सिंहाचा वाटा राहिला ते म्हणजे JNPT बंदर प्रशासन ज्यांनी जवळपास ७०% पर्यंत मासेमारी क्षेत्राचा कायमस्वरूपी नायनाट केला. जेएनपीटी बंदर जे ठाणे खाडीमुख व न्हावा शेवा खाडी मुखात स्थापित केलेले आहे ज्यामुळे २०० चौरस किलोमीटर मासेमारी क्षेत्र कायमस्वरूपी बाधित झाले आहे. समुद्रात, खाड्यांमध्ये भराव, त्याचबरोबर किनारपट्टी भागातील खाजण क्षेत्रेदेखील मोठ्या प्रमाणावर जेएनपीटीच्या माध्यमातून भराव घालण्यात आले आहेत. ONGC यांच्या माध्यमातून २०% खाजण क्षेत्रांचा नाश करण्यात आला आहे.

संपूर्ण उरण तालुका हा कुठल्याही प्रकारची पूर परिस्थितीचा इतिहास नाही. अगदी २६ जुलै २००५ मध्ये जेव्हा संपूर्ण एमएमआर क्षेत्र पुराच्या पाण्यामुळे बुडाले होते तेव्हा देखील उरण तालुक्याला पुराची झळ बसली नव्हती. परंतु आता परिस्थिती हाताबाहेर जात होती. कारण सातत्याने विकासाच्या नावाखाली सखल भाग, खाजण क्षेत्रांवर भराव, पक्ष्यांचे अधिवास नष्टीकरण व त्याच्या थेट परिणाम हा स्थानिक गावात निर्माण होणारी पूर परिस्थिती होय.

**पाणजे – डोंगरी पाणथळ** – सदरचे पाणथळ क्षेत्र हे २८९ हेक्टर क्षेत्रावर पसरलेले आहे. अतिशय उच्च प्रकारची जैवविविधता असणारे संपूर्ण महाराष्ट्रातील एकमेव असे किनारी पाणथळ क्षेत्र म्हणून याचा लौकिक आहे. सदरचे पाणथळ क्षेत्र विकास नावाच्या राक्षसाने गिळंकृत करू नये म्हणून २०१८ साली मी माननीय मुंबई उच्च न्यायालय येथे धाव घेत जनहितयाचिका दाखल केली. चव्हाण ने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे की, सदरचे पाणथळक्षेत्र हे कांदळवनांनी वेढलेले असल्यामुळे ते CRZ एक या वर्गात मोडते. भविष्यात येथे कोणताही विकास करताना संबंधित प्राधिकरणाची पूर्व परवानगी आवश्यक आहे. या निर्णयानंतर रिलायन्स सेझ प्रकल्पधारक बिथरले व त्यांनी या संपूर्ण पाणथळ क्षेत्राचा ताबा घेतला घेतला. सिक्युरिटी गार्ड तैनात करण्यात आले. स्थानिक लोकप्रतिनिधीशी संगनमत करून त्यांच्या टीम स्थापन करून त्यांच्यावर विशेष जबाबदारी सोपविण्यात आली ती अशी की, नैसर्गिक भरतीच्या पाण्याचे स्रोत बंद ठेवायचे पाणी कुठल्याही परिस्थितीत पाणजे येथील पाणथळ क्षेत्रात शिरु नये. त्याच बरोबर सदर पाणथळ क्षेत्रात भेटी देणाऱ्या हौशी पक्षी निरीक्षक, स्थानिक मासेमार व बीएनएचएससारख्या संस्थांच्या शास्त्रज्ञांना अटकाव करणे हे सर्व प्रकार सुरु केले.

रात्री अपरात्री स्थानिकांच्या मदतीने कांदळवन कत्तल, सुक्या गवतास आगी लावणे, पाणथळ क्षेत्रात आलेल्या निरपराध पक्ष्यांना मोठ्या आवाजाचे फटाके वाजवून पिटाळून लावणे, (या संदर्भात दिनांक ०६/०९/२०२१ रोजी रिलायन्सच्या या अघोरी कृत्यांबद्दल सदर प्रकरण हे वनविभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे वर्ग करुन वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे), पाणथळ क्षेत्रात आलेल्या भरतीचे पाणी पंपसेट लावून बाहेर सोडून ते सुकविणे वगैरे प्रकार रिलायन्स सेझतर्फे सातत्याने होत होते. अनेकवेळा, पक्षी हे सुक्या जमिनीवर हताशपणे बसून जणू पाण्याची प्रतीक्षा करीत आहेत असे चित्र अनेकवेळा पहाताना वेदना होत होत्या.

वरील सर्व प्रकार त्वरीत बंद व्हावे यासाठी शेवटी २०२१ साली माननीय राष्ट्रीय हरित लवादाकडे पुणे वेस्टर्न बेंच येथे दाद मागितली. माननीय राष्ट्रीय हरित लवादाने पर्यावरण विषयक महत्त्व अधोरेखित करत त्वरित भरतीचे पाण्याचे स्रोत खुले करण्याचे आदेश सिडको व जिल्हाधिकारी रायगड यांना देण्यात आले, तसेच सदरच्या पाणथळ क्षेत्राभोवती रिलायन्सतर्फे स्थापित करण्यात आलेल्या सेक्युरीटी केबीन्स हटविण्याचे व सखल भागात कोणताही भराव घालू नये व टाकलेला भराव काढून टाकावा, असे आदेश देण्यात आले.

तत्पूर्वी, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र राज्य याद्वारे २० नोव्हेंबर २०२० रोजी दिलेल्या आदेशाचे पालन करावे असे निर्देश माननीय राष्ट्रीय हरित लवादाने दिले होते.

यानंतर वरील निर्णयास सिडको व NMSEZ ( Navi Mumbai special economic zone) यांच्या द्वारे मुंबई उच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आल्या ज्याची सुनावणी माननीय

मुंबई उच्च न्यायालयात दिनांक १७ ऑक्टोबर २०२२ रोजी पार पडली, ज्यात त्यांनी माझ्याबद्दल अत्यंत आक्षेपार्ह, व्यक्तिगत प्रतिक्रिया व मत न्यालायाच्या खंडपीठाने (श्री. गौतम पटेल व श्रीमती गौरी गोडसे) यांनी व्यक्त केले व अगोदर घेतलेले माननीय राष्ट्रीय हरित लवादाने निर्णय रद्दबाबत ठरविले. मात्र, २० नोव्हेंबर २०२० रोजी पर्यावरण विभाग महाराष्ट्र राज्य ह्यांनी घेतलेला हा निर्णय अबाधित राखला.

पाणजे - डोंगरी पाणथळ क्षेत्र त्याच बरोबर उरण तालुक्यातील बेलपाडा, सावरखार, करल, भेंडखळ येथील पाणथळ क्षेत्र संरक्षित करण्याविषयी बीएनएचएसने सिडकोला निवेदन सादर केले होते. परंतु ते सिडकोच्या विकास धोरणाशी मेळ खात नसल्यामुळे आज, या सर्व पाणथळींची अवस्था मरणप्राय झालेली आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे वर नमूद केलेल्या सर्व पाणथळी identified wetlands श्रेणीत मोडतात.

लोकसभा निवडणूक एप्रिल २०१९ पासून निवडणूक काळात, जेव्हा सर्व सरकारी प्रशासकीय अधिकारी निवडणुकीच्या कामात व्यस्त असतात, त्याचा गैरफायदा हा समाजकंटकानी घेत अनधिकृतपणे या पाणथळीवर भराव टाकून ती जवळपास ८०% पर्यंत ती बुजवून टाकली. या संदर्भात, NMSEZ प्रकल्पधारक (रिलायन्स) यांच्यावर एफआरआयदेखील दाखल करण्यात आलेले आहे. विशेषत भेंडखळ व पागोटे या पाणथळी संबंधात.

उरण तालुका म्हणजेच हिरव्यागार वनश्रीने, कांदळवनानी, उच्च प्रतीची, खाजण क्षेत्रे व लाखो स्थलांतरित पक्ष्यांचा नैसर्गिक अधिवास असलेला तालुका व हीच खरी उरण तालुक्याची ओळख ती ओळख कायमची स्वरुपी पुसली जाण्याचा गंभीर धोका निर्माण झालेला आहे.

माझा विकासाला विरोध नाही. परंतु विकासाच्या अनुषंगाने तुम्ही निसर्ग सरसकट कायमस्वरूपी नेस्तनाबूत कराल तर ते मान्य नाही. यासाठीच सन २००७ पासून हा अनमोल नैसर्गिक ठेवा वाचविण्याठीची माझी धडपड सुरू आहे.

हा लढा कधीच सोपा नसतो कारण एकाचवेळी तुम्हाला वेगवेगळ्या आघाड्यांवर लढाई करावी लागते, जसे प्रशासकीय यंत्रणा, स्थानिक लोकप्रतिनिधी, राजकीय नेते मंडळी, स्थानिक समाजकंटक आणि न्यायालयीन लढा वगैरे. या संपूर्ण प्रवासात अनेकवेळा मला धमक्या दिल्या गेल्या, पैशांची आमिषे दाखविण्यात आली, अनेकवेळा मला स्थळ पहाणीच्या वेळी प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत समाजकंटकांनी घेरले होते.

पंजे-डोंगरी येथील पाणथळ वाचविताना चारवेळा माझी समाजकंटकांनी घेराबंदी केलेलीं होती. परंतु, दिनांक २९ डिसेंबर २०२१ रोजी तर कहरच झाला. माननीय राष्ट्रीय हरित लवादाने दिलेले निर्देश पाळले जात आहेत की नाहीत याची शहानिशा करण्यासाठी मी देबी गोएंका (Executive trustee, conservation action trust) यांच्या सोबत सदर पाणथळ क्षेत्रात गेलो असता सोबत उरण तहसीलदार श्री. भाऊसाहेब अंधारे, रेंज फॉरेस्ट ऑफिसर श्री. शशांक कदम, सिडको नोडल ऑफिसर श्री. प्रमोद पाटील व इतर यांच्या उपस्थितीत हरेश्वर भोईर, स्थानिक समाजकंटक धर्मेंद्र पाटील, हेमंत पाटील व इतर असे मिळून पंधरा ते वीस लोकांनी घेरून जीवे मारण्याची धमकी देत स्थानिक तहसीलदार यांना धमकावत शिवीगाळ करण्यात आली.

या संदर्भात (Nhava Shewa police station, Uran) येथे धर्मेंद्र पाटील व हेमंत पाटील यांचेवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांना अटक करून १४ दिवस तुरुंगात रवानगी करण्यात आली.

या प्रचंड खडतर प्रवासानंतर पदरी काही यश पडणे स्वाभाविक आहे त्याप्रमाणे-

१) पानजे-डोंगरी (२८९ हेक्टर) पाणथळ क्षेत्र संरक्षित करण्याविषयी न्यायालये व सरकारी, प्रशासकीय पातळीवर सकारात्मक प्रतिसाद.

२) घुतुम, उरण पनवेल नॅशनल हायवे ३४८ येथील १२.५ एकर क्षेत्रावर पसरलेले कांदळवन सिडकोच्या अक्षम्य कृतीमुळे नाहक बळी गेलेले कांदळवन क्षेत्र पुनर्जीवित करण्यात यश आले.

३) जेएनपीटी टर्मिनल ४, (administration building, near hovercraft jetty) येथे ४.५ हेक्टर क्षेत्रावर पसरलेले कांदळवन क्षेत्र जेएनपीटीच्या गलथान कारभारामुळे नाहक बळी गेलेले कांदळवन पुनर्जीवित करण्यात यश आले. या गुन्ह्याबद्दल जेएनपीटी प्रशासनावर एफआयआर फाईल करून सुमारे तीन लाख रुपयांचा दंडदेखील ठोठावण्यात आला.

४) बोरीपाखाडी, द्रोणगिरीनोड उरण येथील २.५ एकर कांदळवन क्षेत्रावर उरण नगरपरिषदेद्वारे स्थापित करण्यात आलेला घनकचरा प्रकल्प दुसरीकडे हटविण्यात यश प्राप्त झाले.

५) वेगवेगळ्या आघाड्यांवर न्यायालयीन लढाई करीत असताना जसे सन्माननीय मुंबई उच्च न्यायालय, राष्ट्रीय हरित लवाद, सर्वोच्च न्यायालय दिल्ली व राष्ट्रीय मानवी हक्क आयोग इत्यादी यांच्या माध्यमातून न्याय जरूर मिळाला. विशेषत MTHL project (Mumbai Trans harbour link) एमएमआरडीए व जेएनपीटी बंदर प्रशासन यांनी खाजण क्षेत्रे नष्ट केल्यामुळे पारंपरिक उदरनिर्वाहाचे स्त्रोत बाधित झाले.

केवळ आर्थिक मदत देऊन आमच्या जखमा कधीच भरून येऊ शकत नाहीत किंबहुना कितीही आर्थिक मदत देऊ केली तरीही ती न्याय

देऊ शकत नाही कारण अशा विकासामुळे आमची पारंपरिक उदरनिर्वाहाचे साधने कायम स्वरुपी नामशेष झाली आहेत. हा प्रश्न फक्त उदरनिर्वाहापुरता मर्यादित नाही तर आमची संस्कृती, परंपरा यांच्यावर प्रचंड प्रभाव टाकणाऱ्या आहेतच. शिवाय आमची ओळख व अस्तित्वाचा प्रश्न आहे.

दुसरीकडे मात्र जेएनपीटी प्रकल्पामुळे विस्थापित व बाधित झालेल्या शेवा कोळीवाडा ग्रामस्थ गेल्या ३८ वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत ही अत्यंत खेदाची बाब आहे.

वरील सर्व लढाईत मोलाची साथ व भूमिका राहिली ते प्रामुख्याने स्थानिक मासेमार समाज बांधव (पारंपरिक मच्छिमार बचाव सामाजिक कृती समिती, उरण) तसेच नेटकनेक्टचे पर्यावरणवादी कार्यकर्ते श्री. बी.एन. कुमार यांची मोलाची साथ लाभली.

शेवटी आपण एक माणूस म्हणून जगत असताना आपल्यावरील काही नैतिक जबाबदाऱ्या व सामाजिक बांधिलकी यांचे भान ठेवणे आवश्यक आहे. जो निसर्ग आपण निर्माण करू शकत नाही तो बरबाद करण्याचा नैतिक अधिकार आपल्याला आहे का?





*****

## निसर्ग गान

उफाळालेल्या समुद्रात
लाटावर होऊन स्वार
माशांची करी शिकार
गरुडाचा हा रुबाब

इंद्र धनुषी रंग चमके
पाण्यात उभी सूर
घेतो मासा चोचित
खंड्या असा पटाईत

आला खाटीक आला
कोतवाल देतो इशारा
पाखरांचा कलकला
पिल्ले पळती आसरा.

हवेतल्या हवेत
कोलंट्या मारत
वेड्या राघूची करामत
पंतगाची करी फ़राळ

आकाशी पक्ष्यांची माळ
काठावर पक्ष्यांची चाळ
झाडावर घरट्यांची रांग
जंगलात मोरांचा नाच

हिरव्या मिठूची हाक
चिमण्यांची चिवचिव
कोकिळेची तान
निसर्गाचे मंगल गान,

**वसंत सोमा**
सोलापूर

# शेतातील पाखरे - निसर्गाचे सफाई कर्मचारी




**विक्रम पाटील**

9970225538

pvikram123@gmail.com


महाराष्ट्रातील आणि समग्र भारतीय उपखंडात शेती एकात्मिक पद्धतीची होती. त्यात बदल होत गेला आणि आताच्या काळात एक पीक पद्धतीची शिफारस केल्या जाते. एक पीक पद्धतीची शेती प्रमुख्याने पैसा केंद्रीभूत शेती आहे. 'अधिक उत्पादन अधिक उत्पन्न' या हेतूने एक पीक पद्धतीचा विकास घडला आणि शेतीतील प्रश्न बदलले. समस्या बदलल्या तसे उपायही बदलले आणि नकळत किंवा जाणतेपणी आपण शेतात विषाची पेरणी करू लागलो. या विष पेरणीने एकात्मिक शेतीची रया हरवत चालली आहे हे उद्याचे मोठे संकट आहे. संकट उत्तरोत्तर भीषण होत चालले आहे. त्यात पर्यावरणाचा ऱ्हास भर घालतोय. हवामान बदलाने आम्हास हे थोडेसे अवगत होते आहे पण पुढे कसे जायचे ते कळत नाही. त्याचा उत्तम नमुना म्हणून आपण गिधाड पक्ष्यांचा गेल्या सुमारे पन्नास वर्षांचा अस्तित्वाचा लढा समजून घेऊ म्हणजे आपणास शाश्वत शेतीच्या दृष्टीने काही आकलन होईल.

'निसर्गाचे सफाई कर्मचारी' अशी गिधाडांची ओळख वैज्ञानिक दृष्टीने आपणास झालेली आहे. पूर्वी हे साऱ्यांनी अनुभवलेले आहे. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी प्रत्येक गावात, प्रत्येक कुटुंबात भरपूर पाळीव प्राणी असत. शेतकऱ्याच्या दावणीला गाई, बैल, म्हशी, हेला, शेळ्या, एखादे घोडंही, कुत्रेही असायचे. शेतमजुरांकडे शेळ्या असायच्या. दावणीचे जनावर वयोमानानुसार दावणीलाच मरायचे. हे मेलेले जनावर गावाच्या एका दिशेला निश्चित जागी शेतकरी नेऊन ठेवायचा. तेथे चामडी कमावणारे त्या गुराची त्वचा वेगळे करायचे. त्वचा काढल्यानंतर एखाद दोन दिवसात तेथे हमखास गिधाडे यायची. त्या मेलेल्या जनावराच्या मांसाच्या कुजण्याची प्रक्रिया व्हायच्या आत गिधाडे ते मास खाऊन टाकायचे. गिधाडासोबत कुत्री, तरस, कावळे यांचाही राबता होता पण प्रमुख्याने गिधाडे मोठे कार्य उरकायचे. गिधाडे नसती तर ते मास जागेवरच सडले कुजले असते. तेथे रोगराई मोठ्या प्रमाणावर पसरली असती. मृत जनावरांच्या मासाची विल्हेवाट लावण्याचे काम गिधाडे नियमित करत आलेत म्हणून त्यांना 'जंगलांचे स्वच्छता दूत' म्हणतात.

महाराष्ट्रभरात सहा प्रकारची गिधाडे आढळतात. पांढरे गिधाड, पांढऱ्या पुठ्ठ्याचे गिधाड, लांब चोचीचे गिधाड, युरेशियन गिधाड, काळे गिधाड आणि राज गिधाड. गिधाड आकाराने धिप्पाड मात्र दिसायला विरूप पक्षी आहे. लहान गिधाड सुमारे ६० सेंटिमीटर पेक्षा मोठे तर मोठ्या गिधाडांची लांबी सुमारे १३० सेंटिमीटर दरम्यान असते. शरीर साधारणता पिसारा झडलेल्या मोरा एवढे असते. बाकदार आणि मजबूत चोच, मानेवर पिसे नसतात. मान लांब आणि वक्राकार असते. मेलेल्या मोठ्या गुरांच्या अस्थी पिंजऱ्याच्या आत मान घालून अन्न मिळविण्यास त्याचा उपयोग गिधाडांना होतो. त्यामुळेच ते दिसायला ओंगळवाणे वाटतात. अस्वच्छता, धिप्पाड देह यामुळे कुत्री गिधाडांवर हल्ला चढवत नसावी. गिधाडे अन्न मिळवताना एकत्र दिसत असले तरी ते बहुदा एक एकटे असतात. गिधाडांची घरटी निबीड अरण्यात मोठ्या वृक्षांवर किंवा डोंगरदऱ्यात उंच कड्यांवर, अवघड सुळक्यावर असतात. गिधाडांचा प्रजनन दर कमी असून घरटी एक किंवा जास्तीत जास्त पाच अंडी आढळतात. गिधाडांच्या वया संदर्भात अनेक समज-गैरसमज आहेत. परंतु गिधाडांचे वय सुमारे पन्नास वर्षेअसावे. गिधाडांची मादी नरापेक्षा किंचित मोठी असते.

सन १९९६ पर्यंत गिधाडांच्या सर्व सहा जाती जळगाव जिल्ह्यात लेखकाने पाहिलेल्या आहेत, नोंदवलेल्या आहेत. साधारणतः सन १९९५ पासून ते २००० पर्यंत गिधाडांची संख्या कमी कमी होत आता लुप्त होण्यापर्यंत येऊन ठेपली आहे. शेती जसजशी अधिकाअधिक अर्थ केंद्री होत गेली तशी बिनकामाची गुरं विक्री वाढली. त्यामुळे वाढलेली दावणीची गुरं कमी कमी होत गेली. अर्थात दावणीला गुरं मरायचं प्रमाण कमी कमी होत गेलं. गिधाडांचे अन्न कमी होत गेलं हे एक कारण. पण यापेक्षा दुसरे कारण अधिक महत्त्वाचे आणि प्रभावी ठरले कोणते आणि कसे ते समजून घेऊ.

महात्मा ज्योतिराव फुले यांचे प्रसिद्ध कवन आपण जाणतोच.

विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली।।
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले।।
वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले।।

शूद्रांच्या -हासाचा सुरेख संदर्भ आणि विद्येची महती आपणास क्रांतिसुर्यांनी दाखवली. विद्या आणि शूद्र यांचा संबंध सहा ओळीत स्पष्ट केला. गिधाडांच्या ऱ्हासास असेच एक औषध कारणीभूत ठरले. ते म्हणजे डायक्लोफिनॅक (Diclofenac). डायक्लोफिनॅक ही औषधी गुरांच्या काही आजारांवर गुणकारी म्हणून दिल्या जात होती. त्यामुळे

गुरांचा आजार दुरुस्त व्हायचा मात्र या औषधीचा अंश गुरांच्या शरीरात साठत होता.ज्या गुरांच्या स्नायूत डायक्लोफिनॅक औषधी आहे असे जनावर मेल्यानंतर हे औषध गिधाडांच्या शरीरात अन्नाद्वारा प्रविष्ट झाले. गिधाडांच्या जीवनप्रणाली वर त्याचा मोठा परिणाम झाला. तो म्हणजे गिधाडांच्या अंड्याचे कवच ठिसूळ झाले. पर्यायाने गिधाडांचे अंड्यातून पिलांचा जन्म होणे जिकिरीचे झाले. अंड्यातच पिलू मरण पावल्याने गिधाडांची संख्या कमी कमी होत गेली. गिधाडे दिसेनाशी झाली.

उशिराने का होईना समाजाला जाग आली तशी गुरांना डायक्लोफिनॅक औषधी वापरण्यावर बंदी आली. त्यामुळे पाळीव गुरांच्या शरीरात डायक्लोफिनॅकचा अंश कमी कमी होत गेला. पण नामशेष होण्याच्या मार्गावरील गिधाडे येतील कशी? त्यांची संख्या वाढेल कशी? पक्षी अभ्यासक आणि पर्यावरणवादी यांच्या चर्चांमधून सतत याविषयी खल होत राहिला. सरकारास दोष देणे सुरू होते. काहीतरी केले पाहिजे पण नेमके काय करावे हा प्रश्न होता. महाराष्ट्रात सह्याद्रीने काही गिधाडे वाचवलेली होती. त्यांचे तुरळक का होईना दर्शन घडत होते. त्या परिणामी नाशिक जिल्ह्यात गिधाड दिसणारी जागा म्हणजे नाशिकच्या वायव्येस असणारा हरसुल, अंजनेरी गावादरम्यानचा पट्टा. येथे गिधाड नजरेस पडत असे. येथे लहान लहान वीस-बावीस गावे आहेत. त्या परिसरात एका ओसाड जागेवर २०१५ ला एक 'वल्चर रेस्टॉरंट' म्हणजे गिधाडे क्षुधा शांती गृह चालवायचे ठरवले. मेलेली गुरं त्या रेस्टॉरंट ला नेऊन टाकायची अशी त्याची सुरुवात झाली. त्या कामी शासनाचा वन विभाग, शासन आणि स्थानिक नागरिकांची संयुक्त वनव्यवस्थापन समिती, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना, पक्षी अभ्यासक आणि स्थानिक नागरिक असे सारे एक झाले. स्थानिक परिसरात लोक प्रबोधन घडवले गेले. परिसरातील शेतकरी दावणीला बांधलेली मेलेले गुरं तेथे पोहोचवतात. त्यासाठी वनविभागाकडून शेतकऱ्याचा अल्पसा मोबदला रुपये पाचशे प्रति गुरांसाठी अदा केल्या जातो. तेथे आता गिधाडे दिसू लागलीत. मात्र आतापर्यंत गिधाडांच्या दोनच जाती तेथे आढळतात - पांढऱ्या पुठ्ठ्याचे गिधाड आणि पांढरे गिधाड. एकदा युरेशियन गिधाड आढळल्याची नोंद स्थानिक मित्र अनिल माळी कळवतात. आता या गिधाडांच्या क्षुधा शांती गृहा वर त्या परिसरातील रस्त्यावरील अपघातात मरण पावलेली भटकी कुत्री, डुकरं, शेतकऱ्यांकडील खुंट्या वर मेलेली गुरं येतात. अशा स्वरूपातील आणखी एक गिधाड क्षुधा शांती केंद्र नुकतेच त्याच परिसरात सुरू झालेले आहे. गिधाड क्षुधाशांती केंद्राची ही साखळी वाढली पाहिजे. आता शेतातून गुरांची संख्या कमी होत चालली आहे. गुरांचे नैसर्गिक मरण कमी झाले आहे. टोकाच्या अर्थ केंद्री मानव समाजात गुरं गोठ्यात मरण्यापेक्षा वेळीच बाजारात नेऊन विकून टाकायचे हा शिरस्ता झाला आहे. परिणामी गिधाडांचे खाद्य घटले आहे. जंगलक्षेत्र कमी झाले. तेथील वन्यजीव कमी झाले म्हणजे गिधाडांचे जंगलातील अन्नसुद्धा कमी झालेले आहे. गिधाडे जिवंत प्राण्यांवर हल्ले करत नाहीत, मग जगतील कसे? थोडक्यात म्हणजे कोणत्याही परिसंस्थेतून एखादा सजीव हद्दपार होण्याच्या मार्गावर असला तर त्याचे पुनर्वसन बऱ्यापैकी अवघड असते. अलीकडे महाराष्ट्रात आणि भारतातही बरेच सजीव अधिवासाच्या - हासाच्या परिणामी अडचणीत आलेले आहेत. आपण हे सारे अधिवास सुरक्षित केले पाहिजेत. कोणत्याही अधिवासावर होणारे अतिक्रमण, कोणत्याही पर्यावरण प्रणालीवर होणारे अतिक्रमण थांबवले पाहिजे. एकात्मिक शेती साठी शाश्वत शेतीसाठी ते अत्यंतिक गरजेचे आहे.

कावळे : कावळा आपल्या साऱ्यांच्याच परिचयाचा पक्षी. धीट स्वभाव, चपळ हालचाली, सर्वत्र संचार, वेगवान उड्डाण, लक्षवेधी आवाज या गुणवैशिष्ट्यांमुळेही असेल कदाचित तो साऱ्यांच्या परिचयाचा असतो. कावळ्यांच्या दोन जाती महाराष्ट्रभर आढळतात. कावळा (राखी मानेचा) आणि डोमकावळा (संपूर्ण काळा). त्यांचा काळाकुळीत रंग जवळून न्याहाळता आल्यास त्यावर सुंदर निळसर चकाकी दिसते. कावळ्यापेक्षा डोमकावळा थोडासा मोठा असतो. कावळा गावात तर डोमकावळे गावाबाहेर राहणे पसंत करतात. नरमादी सारखे असतात, मादी आकाराने थोडीशी मोठी असते. दोघे स्वतंत्र असले तरी विणीच्या काळात नर-मादी मिळून काटक्या जमा करून घरटे करतात. झाडाच्या तीन-चार फांद्यांच्या उगमाच्या जागी घरटे करतात. ग्रामीण भागात कावळ्याचे घरटे झाडाच्या शेंड्यावर उंच जागी असल्यास कमी पाऊस पडेल, तर घरटे झाडांच्या मध्यभागी असल्यास भरपूर पाऊस पडेल असा समज आहे. परंतु त्यास काही आधार नाही. पावसाच्या आगमनाच्या काळात घरटी करतात म्हणून समज प्रचलित झाला असावा.घरट्यात कावळीण अंडी घालते, नेमके त्याच वेळी कोकीळ मादीही कावळ्याच्या घरट्यात अंडी घालते. ते शक्य व्हावे म्हणून नर कोकीळ कावळ्याच्या घरट्याच्या परिसरात कावळा नर-मादी ला चिडवत ठेवतो. कावळा कावळी नर कोकीळ नराचा पाठलाग करतात आणि मादी कोकिळा कावळ्याच्या घरट्यात अंडी घालून पसार होते. कावळ्याची मादी एका हंगामात तीन ते सहा अंडी घालते. त्यात कोकिळेच्या अंड्यांची भर पडते. कावळा नर आणि मादी दोघे मिळून घरट्याचे संरक्षण करतात आणि अंडी उबवतात. कोकिळेची पिलं चपळ असतात आणि यशस्वी उड्डाण करून घरटं सोडतात. कावळ्याची पिल्ले लवकर उडणं शिकत नाहीत. पालक कावळे त्यांना उडणं शिकवतात. यादरम्यान बऱ्याचदा कावळ्याची पिल्ले जमिनीवर पडतात आणि

भरकटतात. कावळे सर्वभक्षी आहेत. ते भाकरी, पोळी, वडे, मास, अंडी खातात. उंदीर, सरडे, पाल, कोंबडीची लहान पिलं, सापाची पिल्ले यांची शिकार करतात. मंदिरातील देवाच्या नैवेद्यातील फळे, पोळ्या, भात, कुरडया, भजी सारे काही खातात. मयतास दिलेल्या नैवेद्याचा फडशा पाडतात. त्यामुळे ते हॉटेल परिसर, मास विक्रेते, उकिरडे, डम्पिंग ग्राउंड, स्मशानभूमी, अन्नधान्याची व्यापारी जागा अशा ठिकाणी स्वैर संचार करतात. ते एकएकटे उडताना दिसत असले तरी त्यांच्यात सामाजिक ताळमेळ उत्तम असतो. कावळा त्याची अक्कलहुशारी आणि बदमाशी साठी प्रसिद्ध आहे. वाळलेली भाकरी खाण्यायोग्य नरम होईपर्यंत पाण्यात बुडवून नंतर खाणे, झाडाला कापडात बांधलेली शिदोरी गाठी उकलून पळवणे, गुरांच्या जखमांना टोचून मास खायचा प्रयत्न करणे, भरधाव वाहने धावणाऱ्या रस्त्यावर मेलेले पक्षी, उंदीर, खार, कुत्री यांचे मांस खाणे अशी कामं कावळे लीलया करतात. पाणी पिताना पाणी कमी असल्यास चोच आडवी करून पाणी पिण्याची किमया कावळे करतात. दुकानदाराची नजर चुकवून अंडी पळवणे, पावाची लादी फोडून पावाचा तुकडा पळवणे असले उद्योग करतात. शाळातून ग्राउंड वर विद्यार्थी खिचडी खाताना, डबे खाताना नजर चुकवून त्यांच्या ताटातील अन्न पळवणे कावळ्यांना सहज शक्य होते. मुलं वर्गात गेली की उष्टे खरकटे आवरायचा उद्योग कावळ्या आणि साळुंक्या करतात.

असे हे कावळे शेत शिवारात असले तर शेताचा परिसर निसर्ग समृद्ध आहे असे समजावे. अशा परिसरात अन्नधान्य, मास, भक्ष मुबलक आहे समजावे. तेथे जीवन समृद्ध आहे याचा तो पुरावाच असतो. आपल्या शेत शिवारात म्हणूनच कावळे महत्त्वाचे आहेत. (पुनर्मुद्रित)

*****

# होप, ठाणेतर्फे दिले जाणारे महाराष्ट्र पक्षीमित्र पुरस्कार जाहीर
# उदयोन्मुख पक्षिनिरीक्षक व उदयोन्मुख पक्षिमित्र पुरस्कार जाहीर

ठाणे येथील हियर ऑन प्रोजेक्ट एनव्हार्नमेंट अर्थात होप नेचर ट्रस्ट (HOPE) या संस्थेतर्फे प्रायोजित महाराष्ट्र पक्षीमित्रकडून दरवर्षी पक्षिमित्र संमेलनामध्ये दोन पुरस्कार दिले जात असतात. नवीन पक्षी निरीक्षक व पक्षी अभ्यासक घडावेत यासाठी, पक्षी अभ्यासात रुची दाखविणारे, शाळा महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी यांना प्रोत्साहन देण्यासाठी 'होप' या संस्थेकडून उदयोन्मुख पक्षी निरीक्षक व उदयोन्मुख पक्षिमित्र असे दोन पुरस्कार दरवर्षी दिले जात असतात. या पुरस्कारासाठी महाराष्ट्र पक्षीमित्रकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यामधून पक्षी निरीक्षण व पक्षी अभ्यास या क्षेत्रात नव्याने सुरुवात करून उत्कृष्ट कार्य करून आदर्श निर्माण करणाऱ्या तरुण पक्षी निरीक्षकांची निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे यावर्षी यामध्ये मुलींनी बाजी मारलेली आहे. यावर्षीचा उदयोन्मुख पक्षिनिरीक्षक पुरस्कार कु. अमृता गंगाधर आघाव हीस, तर उदयोन्मुख पक्षिमित्र पुरस्कार कु. यशश्री यशवंत उपरीकर हीस जाहीर करण्यात आला आहे.

उदयोन्मुख पक्षी निरीक्षक हा पुरस्कार २० वर्षांपेक्षा लहान वय असलेल्या विद्यार्थ्यास दिला जात असून यावर्षी या पुरस्कारासाठी भुसे (निफाड) जि. नाशिक येथील कु. अमृता गंगाधर आघाव हिची निवड करण्यात आली आहे. अमृता १२ वी विज्ञान शाखेत शिकत असून, वर्ग पाचवीत असल्यापासून पक्षी निरीक्षण करते. नांदूरमध्यमेश्वर जवळ भुसे गावाची रहिवासी असल्याने नांदूरला पक्षी निरीक्षण करता करता पक्षी अभ्यास करू लागली. ती आता पक्ष्यांची माहिती तिच्या शाळेत सुद्धा सांगत असते. तिने BNHS व वनविभागाच्या अनेक कार्यक्रमात, व कार्यशाळेत सहभाग घेतला असून ती पक्षी जनजागृती यासाठीसुद्धा ते प्रयत्न करीत असते. उदयोन्मुख पक्षिमित्र हा पुरस्कार २८ वर्षांपेक्षा लहान वय असलेल्या तरुणास दिला जात असून यावर्षी हा पुरस्कार सेंदूरवाफा ता. साकोली जि. भंडारा येथील कु. यशश्री यशवंत उपरीकर हीस जाहीर करण्यात आला आहे. कु. यशश्री ही फिजीओथेरेपी या विषयात पदवीचे शिक्षण घेत असून तिला परिसरातील पक्षी तसेच जैवविविधता अभ्यास व नोंदणी यामध्ये विशेष रुची आहे. तिने आजवर नेचर क्लब च्या माध्यमातून परिसरातील अनेक पक्षी व वन्यजीव यांचा अभ्यास केला असून ती BNHS ची पर्यावरण राजदूत सुद्धा होती. तिने आजवर निसर्गविषयक अनेक कार्यक्रम व स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला असून पर्यावरण जनजागृतीसाठी ती अनेक संस्थांसोबत स्वयंसेवक म्हणूनसुद्धा आपली सेवा देत असते. उदयोन्मुख पक्षिनिरीक्षक व उदयोन्मुख पक्षिमित्र या पुरस्कारांसाठी पुरस्कार राशी प्रत्येकी रु. २५००/- इतकी रक्कम, प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. या पुरस्काराचे वितरण येत्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात करण्यात येणार आहे. यावर्षी ३५ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन चंद्रपूर येथे होणार असून या पुरस्कारांचे वितरण या संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

# पहिले धुळे जिल्हास्तरीय विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन



**डॉ विनोद भागवत**
धुळे जिल्हा समन्वयक,
महाराष्ट्र पक्षीमित्र व अध्यक्ष,
निसर्गवेध संस्था, धुळे

धुळे जिल्ह्यात प्रथमच विद्यार्थ्यांसाठी पक्षिमित्र संमेलनाचे आयोजन करण्यात आले. आयोजन व नियोजन धुळे शहरातील निसर्गवेध सेवाभावी संस्थेने पुढाकार घेऊन रविवार, दिनांक ११ सप्टेंबर २०२२ संपन्न झाले.

संमेलनाकरिता धुळे जिल्ह्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या प्राचार्य/मुख्याध्यापकांना परिपत्राद्वारे ऑगस्ट महिन्यात विनंती करण्यात आली. त्यानुसार अनेक शैक्षणिक संस्थांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. प्रत्येक विद्यालयातून ५ विद्यार्थांना सहभागाची मर्यादा होती. जिल्ह्यातील १३ माध्यमिक विद्यालयातुन ५९ विद्यार्थी (मुले/मुली) प्रत्यक्षात सहभागी झाले. त्यांच्या सोबत शिक्षकही उपस्थित होते.

संमेलना दिवशी सकाळी ९.०० पासून विद्यार्थी नोंदणी सुरु करण्यात आली. प्रथम सत्रात संमेलनाचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता धुळे जिल्ह्याचे वनसंरक्षक (प्रादेशिक) श्री दिगंबर पगार (आयएफएस) यांच्या शुभहस्ते झाले. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पक्षी व निसर्ग संवर्धना बाबत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर नाशिक येथून आमंत्रित डॉ. अनिल माळी यांचे दृकश्राव्य व्याख्यान पक्ष्यांना जपा ते तुम्हाला जपतील' या विषयावर झाले. त्यांच्या व्याख्यानाचा सर्वांनी आवडीने लाभ घेतला.

द्वितीय सत्रात विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत एकुण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेकरिता ५ विषय देण्यात आले होते. (१) माझा आवडता पक्षी. (२) पक्षी व पर्यावरण. (३) पक्षी आणि आपले आरोग्य. (४) माझे पक्षी संवर्धन. (५) पक्षी माझे गुरु. प्रत्येक स्पर्धकाला ५ मिनिटे वेळ देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धेत पुरस्कार मिळविलेले विद्यार्थी, अंजली तवर (आ.मा. पाटील माध्य. विद्यालय, पिंपळनेर) प्रथम; प्रणाली ठाकरे (आ. मा. पाटील माध्य. विद्यालय, पिंपळनेर) द्वितीय, निखिल विजय पाटील (न्यू सिटी हायस्कूल, धुळे) तृतीय; भक्ती मच्छिंद्र अहिरे, (रा.के. चितळे माध्य. विद्यालय, धुळे) उत्तेजनार्थ.चित्रकला स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थांनी आपले चित्र/पेंटिंग सकाळी जमा केले. त्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले. चित्रकला स्पर्धेत पुरस्कार मिळविलेले विद्यार्थी, दिनेश रमेश पवार (पिंपळादेवी माध्य. विद्यालय, मोहाडी, धुळे) प्रथम; लावण्या अविनाश पाटील (जयहिंद माध्य. विद्यालय, धुळे) द्वितीय; अदिती संतोष साळवे (नवजीवन इंग्लिश मीडियम स्कूल, धुळे) तृतीय; मरियम शेख (रा.के. चितळे माध्य. विद्यालय, धुळे) उत्तेजनार्थ. द्वितीय सत्रात 'वन्यजीव क्षेत्रात विद्यार्थ्यांना करियर संधी' या विषयावर धुळे येथील वन्यजीव अभ्यासक श्री. हिरेन खत्री यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात धुळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, व प्रख्यात वास्तुविशारद श्री. रवींद्र बेलपाठक यांच्या हस्ते पुरस्कारचे वितरण झाले. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धा परीक्षक सौ. स्मिता सराफ़, डॉ. स्नेहा तोरणे, तर चित्रकला स्पर्धा परीक्षक आर. पी. वाकळे, किशोर वाकळे, प्रभाकर जाधव, भटु भामरे, अविनाश सोनवणे व कुंदन पाटील यांनी काम पाहिले. संमेलन यशस्वी करण्यासाठी निसर्गवेध संस्थेचे एस. टी. चौधरी, प्रभाकर वाघ, राकेश जाधव, संदीप बागल, ॲड. विनोद बोरसे, गोकुळ पाटील, ए. पी. खैरनार, सचिन सोनवणे, श्री. विभांडिक यांनी योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनिता पाटील तर आभार प्रदर्शन निसर्गवेध संस्थेचे उपाध्यक्ष श्री. बी.ए. पाटील यांनी केले.




*****

# दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरीक्षण या अनोख्या उपक्रमाने पक्षी सप्ताहाचा समारोप

महाराष्ट्र पक्षीमित्र, वेक्स आणि वन विभागतर्फे आयोजन

मारुती चितमपल्ली यांचा जन्मदिन दि. ०५ नोव्हेंबर पासून ते पै. डॉ. सालिम अली यांची जयंती दि. १२ नोव्हेंबर पर्यंत राज्यात पक्षी सप्ताह उत्साहात साजरा झाला. महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेकडून ठिकठिकाणी पक्षी सप्ताहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि. १२ नोव्हेंबरला डॉ. सालिम अली यांचे जयंती दिनी या सप्ताहाचा समारोप अमरावती येथे एका अनोख्या उपक्रमाने साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र पक्षीमित्र, वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती यांचे कडून आणि अमरावती वन विभाग, वडाळी रेंज यांच्या सहकार्याने अमरावती येथील बांबू गार्डन येथे, एक प्रयास: दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरीक्षण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या आठवडाभर राज्यात अनेक ठिकाणी पक्षी निरीक्षणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये अनेक डोळस व्यक्तींनी पक्षी निरीक्षण केले. पक्ष्यांना न्याहाळले, मात्र दृष्टिहीन व्यक्तींना हे सुंदर, अनोखे पक्षी बघता येत नाहीत, त्यामुळे त्यांनीसुद्धा ते अनुभवावेत, त्यांचे आवाज ऐकून त्यांची ओळख करून घ्यावी, त्यांच्याविषयी माहिती जाणून घ्यावी या उद्देशाने, या पक्षी सप्ताहाच्या समारोपीय दिवशी दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय, अमरावती येथील विद्यार्थी, विद्यार्थिनी, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. नवनाथ इंगोले, शिक्षक श्री. योगेश चौधरी, सौ. योगिता राउत, श्री. सुभाष इरपाते, शाळेचे वैद्यकीय सहायक, श्री. प्रशांत गाडगे, श्री. रमेश राठोड व श्री. नीलकंठ नाथे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, या कार्यक्रमाचे समन्वयक श्री. सौरभ जवंजाळ यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना व पक्षी सप्ताहविषयी माहिती देऊन दृष्टिहीन विद्यार्थ्यांना पक्षी कसे असतात आणि त्यांच्या आवाजावरून, त्यांच्या पिसांवरून ते कसे ओळखावेत याविषयी प्राथमिक माहिती दिली व उपस्थितांचे स्वागत केले. पक्षी निरीक्षणादरम्यान मार्गदर्शक डॉ. पवन राठोड, श्री. विक्रांत रामटेके, श्री. सौरभ जवंजाळ, श्री. प्रशांत निकम, ॲड. राजमेहेर निशाने व डॉ. जयंत वडतकर यांनी विद्यार्थ्यांना आवाजावरून पक्षी ओळख करून दिली. पक्ष्यांचे आकार व त्यांचे रंग कसे असतात हे ओळखीच्या वस्तू हाताळण्यास देऊन आणि निसर्गातील रंगांची माहिती देऊन विद्यार्थ्यांना पक्षी कसा दिसत असेल हे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. निसर्गातील वापरून टाकून दिलेली सुगरण व दयाळ पक्ष्यांची घरटी विद्यार्थ्यांना हाताळण्यास देऊन पक्ष्यांची घरटी कशी असतात, तसेच पक्ष्यांची विविध पिसं हाताळण्यास देऊन पक्ष्यांची अधिक माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला. पक्षी निरीक्षण कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी अमरावती वन विभागाच्या सहाय्यक वनसंरक्षक सौ. ज्योती पवार व वनपरिक्षेत्र अधिकारी सौ. वर्षा हरणे यांनीसुद्धा उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमासाठी वेक्स चे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत वऱ्हेकर, सदस्य श्री. धनंजय सायरे, वेदांत गाडगे, वरुण जिचकार यांचीसुद्धा उपस्थिती होती.

*****

# १४० वर्षांनंतर सापडला पक्षी

भारतातील रानपिंगळा (Forest Owlel) ७२ वर्षांनंतर सापडला.आता तो अनेक ठिकाणी दिसू लागला आहे. त्यावर ताण म्हणजे १४० वर्षांनी काळ्या मानपाठीचा फेजर पीजन सापडला. झाले असे की, त्याच्या शोधासाठी निघालेल्या चमूने क्वामा नदीच्या किनारी लावलेल्या कॅमेऱ्यात ३२०० फुटांवर हा पक्षी दिसला. हा चमू तो देश सोडून जाण्यापूर्वी केवळ दोन दिवस आधी हे दर्शन झाले.

२०१९ साली हा पक्षी शोधण्याचा प्रयत्न झाला होता; पण तेव्हा यश आले नव्हते. त्या निबिड भागातच केवळ तो राहत असल्याने तो नामशेष झाल्याचा अंदाज व्यक्त होत होता.

# महाराष्ट्र पक्षीमित्रचे पुरस्कार जाहीर
# पक्षीमित्र जीवन गौरव पुरस्कार श्री. बी. एस. कुलकर्णी यांना जाहीर



गेली चार दशके महाराष्ट्रात पक्षिविषयक कार्य करणारी संस्था महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे देण्यात येणाऱ्या २०२२ च्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, यावर्षीचा पक्षीमित्र जीवन गौरव पुरस्कार सोलापूर येथील श्री. भीमाशंकर शा. कुलकर्णी यांना जाहीर करण्यात आला. इतर पुरस्कारांपैकी पक्षी संशोधन पुरस्कार नांदेड येथील प्रा. डॉ. जयवर्धन विठ्ठलराव बलखंडे यांना, पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार सोलापूर येथील श्री. राजकुमार जगदीश कोळी यांना तर पक्षी जनजागृती पुरस्कार गडहिंग्लज येथील श्री अनंत बाबू पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे. पक्षी सबंधित विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे २०१९ पासून या पुरस्कारांची सुरुवात करण्यात आली असून यामध्ये दरवर्षी चार पुरस्कार देण्यात येत असतात. या पुरस्कारांची घोषणा महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे अमरावती येथे संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी केली. या पुरस्कारांचे वितरण येत्या ३५ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात करण्यात येणार आहे.

यावर्षीचा स्व. रमेश लाडखेडकर स्मृती पक्षीमित्र जीवन गौरव पुरस्कार हा दीर्घकाळ पक्षिमित्र चळवळीत राहून, पक्षी संवर्धन व जनजागृती यासाठी कार्यरत पक्षिमित्र, चळवळीतील मार्गदर्शक, जेष्ठ सभासद, तथा पक्षी विषयक पुस्तकांचे लेखक, माळढोक पक्ष्याचे अभ्यासक सोलापूर येथील श्री. भीमाशंकर शा. कुलकर्णी यांना जाहीर करण्यात आला आहे. रोख रक्कम, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून हा पुरस्कार विदर्भ पक्षिमित्र मंच द्वारे डॉ. अनिल पिंपळापुरे यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आला आहे. दुसरा पुरस्कार स्व. डॉ. जी. एन. वानखेडे स्मृती पक्षी संशोधन पुरस्कार हा पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी अभ्यास, संशोधन, प्रकाशने आणि त्या माध्यमातून जनजागृती आदी क्षेत्रात कार्यरत पक्षीमित्रचे सभासद नांदेड येथील प्रा.डॉ. जयवर्धन विठ्ठलराव बलखंडे यांना जाहीर करण्यात आला. रोख रक्कम, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून हा पुरस्कार स्व. डॉ. जी.एन. वानखेडे मेमोरिअल फंडतर्फे प्रायोजित करण्यात आला आहे.

यावर्षीचा पक्षीमित्र पक्षी संवर्धन व सुश्रुषा हा पुरस्कार पक्षिमित्र चळवळीतील पक्षी संवर्धन, अधिवास संवर्धन तथा जखमी पक्षी उपचार आदी क्षेत्रात कार्यरत पक्षीमित्र सभासद, तथा जीआयबी फाउंडेशन या संस्थेसोबत कार्यरत असलेले सोलापूर येथील पक्षिमित्र श्री. राजकुमार जगदीश कोळी यांना जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार नागपूर येथील महाराष्ट्र पक्षीमित्रचे सदस्य श्री. अनिल बहादुरे यांचेतर्फे प्रायोजित करण्यात आला आहे. चौथा पुरस्कार स्व. रामभाऊ शिरोडे (वाणी) स्मृती पक्षीमित्र पक्षी जनजागृती पुरस्कार हा पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी अभ्यास आणि जनजागृती आणि पक्षी निवडणुकीच्या माध्यमातून पक्षी विषयक जनजागृती आदी क्षेत्रात कार्यरत गडहिंग्लज येथील सभासद श्री. अनंत बाबू पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे. रोख रक्कम, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून हा पुरस्कार श्री. अविनाश शिरोडे, नाशिक यांचेतर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

या पुरस्काराचे वितरण ३५ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात करण्यात येणार असून यावर्षी महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन चंद्रपूर येथे फेब्रुवारी २०२३ मध्ये होणार आहे. या पुरस्कारांचे वितरण संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र पक्षीमित्र तर्फे संस्थेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी कळविली आहे.

*****

# अकोला येथे सातवे शालेय पक्षिमित्र संमेलन उत्साहात संपन्न
## विद्यार्थ्यांनी दिला नायलॉन मांजा न वापरण्याचा संदेश

शालेय विद्यार्थ्यांमध्ये पक्षी निरीक्षण या छंदाबद्दल आवड निर्माण करण्यासाठी व त्या माध्यमातून पक्षी व पर्यावरण संवर्धनाची दिशा दाखविण्यासाठी जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) अकोला, निसर्गकट्टा, अकोला वन विभाग व महाराष्ट्र पक्षीमित्र यांच्या संयुक्त विद्यमाने आज शनिवारी १० डिसेंबरला माऊंट कारमेल हायस्कूल हॉलमध्ये आयोजित ७ व्या शालेय पक्षिमित्र संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते

पक्षिमित्र संमेलनानिमित्त निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा व मोबाईल फोटोग्राफी स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. दरवर्षीप्रमाणे यंदाही संमेलनाध्यक्षांची निवड निबंध स्पर्धेतून करण्यात आली. सर्वोत्कृष्ट निबंध लिहिणाऱ्या विद्यार्थिनी चैताली बाळ हिला संमेलनाच्या अध्यक्षाचा मान मिळाला. तर माऊंट कारमेलचे प्राचार्य फादर मॅथ्यू करीगल, शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर, पक्षी अभ्यासक कौस्तुभ पांढरीपांडे (कारंजा), अनुल मनवर (अकोला), निसर्गकट्टाचे संस्थापक अमोल सावंत यांच्या उपस्थितीत वृक्ष पूजनाने संमेलनाचे उद्धाटन झाले. त्यानंतर कौस्तुभ पांढरीपांडे यांनी तणमोर पक्ष्यावर तर अनुल मनवर यांनी स्लाईड शोच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. डॉ. संतोष सुरडकर यांनी पक्षी निरिक्षण एक अनुभव या विषयावर सादरीकरण केले. यावेळी निबंध स्पर्धेत प्रथम चैताली बाळ, द्वितीय सुमित निकम, तृतीय अर्थव पाटील व उत्तेजनार्थ पारितोषिक निधी जाधव व शिवगंध जोत यांना मिळाले. तर वकृत्व स्पर्धेमध्ये प्रथम कु. तनुश्री दाभाले,  बाल शिवाजी हायस्कूल, द्वितीय पूर्वा किशोर बळी, प्रभात किड्स, तृतीय तेजस्विनी गुरव धनाबाई विद्यालय बाळापूर, प्रोत्साहन पर आयना आसिमोद्दीन शाहबाबू विद्यालय, पातूर, व अदिती वानखडे खंडेलवाल विद्यालय या पारितोषिके मिळाली. पथनाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक जि.प. शाळा, गोपालखेड, द्वितीय क्रमांक राजेश्वर कॉन्व्हेंट,  तृतीय क्रमांक सन्मित्र पब्लिक स्कूल व उत्तेजनार्थ श्री. यशोदाबाई इंगळे विद्यालय व्याळा यांना मिळाले. वक्तृत्व स्पर्धेसाठी डॉ. स्वाती दामोदरे, डॉ. निशाली पंचगाम व श्रीमती कांचन पटोकार तर पथनाट्य स्पर्धेसाठी डॉ. प्रदीप अवचार व अमोल इंगळे हे परीक्षक म्हणून लाभले होते.

मोबाईल फोटोग्राफीमध्ये सायली अंभोरे प्रथम क्रमांक, सक्षम तायडे द्वितीय व मोहम्मद सोशल मोहम्मद अनिस याला तृतीय क्रमांक मिळाला बक्षीस वितरण समारंभात मंचावर श्री. अर्जुन के. आर उपवन संरक्षक अकोला वन विभाग, डॉ. सुचिता पाटेकर, शिक्षणाधिकारी, माध्य. जि.प. अकोला व वृक्षप्रेमी श्री. विवेक पारसकर, श्री. कांचन पटोकार, निसर्गकट्टा चे अध्यक्ष श्री अजिम शेख व महाराष्ट्र पक्षीमित्रचे विदर्भ समन्वकय श्री. अमोल सावंत उपस्थित होते. या वेळेस पक्षिमित्रांतर्फे श्री. विवेक पारसकर यांना कृतज्ञता पुरस्कार व श्री. मंगेश तायडे यांना दीपस्तंभ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तसेच श्री. हिमांशु पाटेकर यांच्या पक्ष्यांच्या फोटोचे टेबल कॅलेंडरचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संदीप वाघडकर यांनी केले होते. संमेलनात ४० शाळांचे विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

७ वे शालेय पक्षिमित्र संमेलन यशस्वी करण्यासाठी डॉ. मिलिंद शिरभाते, डॉ. हरिष मालपाणी, श्री. अजय फाले, श्री. मनोज लेखनार, श्री. राहुल ओईंबे, श्री. संतोष सहारे, श्री. प्रेम अवचार, श्री. विजय पवार यांनी परिश्रम घेतले.



*****

# आपल्या माहितीला उजाळा - भाग ६

महाराष्ट्र पक्षीमित्रसंघाच्या त्रैमासिकेचे प्रयोजन केवळ पक्षी निरीक्षण व ओळख या पर्यंतच मर्यादित राहत नाही. त्या संलग्नीत ज्ञान भांडाराची उजळणी करून घेण्यासाठी आपल्या माहितीला उजाळा हे सदर वाचकांच्या पुढ्यात ठेवत आहे. प्रत्येक अंकामध्ये दहा प्रश्नांचा संच दिला जाईल. वाचकांना त्याची उत्तरे शोधून आपल्याकडे असणाऱ्या महितीला उजाळा द्यायचा आहे.प्रत्येक प्रश्नासोबत पुरविलेला सुगावा संपूर्ण क्रियाकलापास रंजक बनवतील अशी अपेक्षा आहे. वाचकांनी आपली उत्तरे अंकामध्ये इतरत्र दिलेल्या उत्तरासोबत पडताळून पाहू शकता. या सदराबद्दल प्रश्न, चर्चा किंवा सूचनांचे स्वागत आहे.

-राघवेंद्र वंजारी
rvanjari@yahoo.co.in

| क्र. | प्रश्न | थोडी मदत |
|---|---|---|
| १. | 'बर्ड्स इन बुक' या ग्रंथाचे लेखक कोण | यांनी 'इंडियन बर्ड्स' या नियतकालिकाची ? सुरुवात केली. |
| २. | लक्षद्वीपचा राज्यपक्षी कोणता? | त्यांचे शास्त्रीय नाव Onychophora fuscatus आहे. |
| ३. | चित्रातले पक्षिशास्त्रज्ञ ओळखा  | यांनी The Nests and Eggs of Indian Birds हा बहुखंड ग्रंथ लिहिला. |
| ४. | जागतिक वर्षावन दिवस केव्हा साजरा केला जातो? | २०१७ पासून हा दिवस साजरा केला जात आहे |
| ५. | डॉ. सालीम अलींच्या नावाने--- पक्ष्याचे नामकरण करण्यात आले आहे. | Zoothera salimalli हे त्याचे शास्त्रीय नाव आहे. |
| ६. | कोणत्या पक्ष्याचं घरटं खाण्यासाठी वापरतात? | हा पक्षी दक्षिण-पूर्व आशियात आढळतो. |
| ७. | Artamidae या पक्षी कुटुंबात कोणाचा समावेश होतो? | या पक्ष्यांच्या चोचीचा खालचा भाग पसरट असतो. |
| ८. | गटात न बसणारा पक्षी ओळखा. नवरंग, दयाळ, उचाट्या, शेकाट्या, धीवर, गप्पीदास. | हा रंगीबेरंगी आहे तर इतर सारे पांढरा-काळा रंगाचे आहेत. |
| ९. | Bluethroat चे मराठी नाव काय? | याचा गळा निळा असतो. |
| १०. | ऑस्ट्रेलियाचा राष्ट्रीय पक्षी कोणता? | हा पक्षी हवेत उडू शकत नाही. |

# टपाल तिकिटांच्या दुनियेत
## गव्हाणी घुबड

Barn Owl (Tyto alba)

घुबड व पिंगळे उलुक गणातले पक्षी आहेत. हे रात्री फिरणारे शिकारी पक्षी आहेत. पिंगळे व घुबडांच्या साठ ते पासष्ट जाती आहेत. त्यापैकी भारतात चाळीस ते पन्नास जाती आढळतात. भारतात सर्वत्र आढळणारे घुबड म्हणजे गव्हाणी घुबड होय. गोंड व आदिवासी त्यास पिंजरा घुबड असे संबोधतात. याच्या पंखावरील रंग पिवळा-सोनेरी व राखी असतो. त्यावर काळे पांढरे ठिपके असतात. त्याच्या शरीराचा खालचा भाग फिक्कट पिवळट पांढरा असतो. त्यावर तपकिरी ठिपके असतात. चपट्या तबकडीसारखा पांढुरका मुखवटा असतो व डोक्याभोवती पांढरी, दाट खरबरीत पिसे असतात. त्याचे डोळे गोल व मोठे असतात. याचे डोळे माणसासारखे समोर व जवळ जवळ असतात. त्यामध्ये असलेली आखूड चोच नाकासारखी दिसते.

हे घुबड दिवसा पडक्या इमारती, अडगळीच्या जागा, जुन्या वाडयांच्या अंधाऱ्या जागेत वास्तव्य करतात. दिवसा एका पायावर उभे राहून झोप काढतात. अंधार झाला की शिकारी साठी बाहेर पडतात. याची श्रवणेंद्रिय व घ्राणेंद्रिय अत्यंत संवेदनक्षम असतात. रात्री ते उंदीर, घुशी तसेच पालींची शिकार करतात. यांचा विणीचा हंगाम वर्षभर चालतो. झाडाच्या ढोलीत व छतावरील कौलांच्या फटीत गवत, काड्या व चिंध्यांच्या सहाय्याने घरटे करतात. मादी एका वेळी चार ते सात अंडी घालते.

Eurasian Eagle Owl (Bubo bubo) हुमा (शृंगी) घुबड हा एक मोठया आकाराचा घुबड असून भारतात सर्व ठिकाणी आढळतो. हे घुबड़ बदामी तपकिरी रंगाचे असते, त्याचा खालचा भाग उजळ असतो व त्यावर गडद काळपट ठिपके असतात. त्याचे डोळे मोठे वर्तुळाकार व नारिंगी रंगाचे असतात. शृंगी घुबडाच्या पायावर भरदार पिसे असतात हे त्याचे वैशिष्ट्य आहे. शृंगी घुबड रूबाबदार व शक्तिमान दिसते, नर व मादी सारखेच दिसतात. हे खडकाळ माळरान, नदी नाल्यातल्या खडकाळ खोऱ्यात आढळते. लहान लहान टेकड्या व विरळ माळरानावरसुद्धा दिसतात. दिवसा दाट झुडपाखाली विश्रांती घेतात खडकाच्या कपारीत झोपतात. रात्री शिकारीस निघतात. शेतातील उंदीर, रानघुशी यांची शिकार करतात. लहान लहान सरपटणारे प्राणी, मोठे



रातकिडे, बेडूक व माश्यांचीही शिकार करतात. परंतु उंदीर व घुशी हे त्यांचे मुख्य अन्न आहे. नोव्हेंबर ते एप्रिल हा त्याचा विणीचा हंगाम असतो. मादी दाट झुडपाच्या अंधारात तीन ते चार लंबगोलाकार गुळगुळीत अंडी घालते. डोंगर कपारीतही यांची विण आढळते.

वरील घुबडा व्यतिरिक्त भारतात पांढुरके शिंगळा घुबड, युरेशियन शिंगळा घुबड, प्राच्य शिंगळा घुबड, कंठेरी शिंगळा घुबड, काळसर हुमा घुबड, मासेमार घुबड, चट्टेरी वन घुबड, तपकिरी वन घुबड, बहिरी घुबड, छोटया कानाचा ठिपकेवाला पिंगळा, रान पिंगळा व जंगली पिंगळा या प्रजाती आढळून येतात.

पुराण काळात सुद्वा घुबडांचा संदर्भ आढळून येतो. घुबड हे देवी लक्ष्मीचे वाहन असून समृद्धीचे प्रतीकं मानले जाते. घुबडांना शेतकऱ्यांचा मित्र मानले जाते कारण शेतातील अन्न धान्याचा नाश करणाऱ्या उंदीर व घुशींची ते शिकार करतात.. तरीही बहुतांश लोक त्याचा कर्कश आवाज ऐकणे, तोंड पहाणे, त्याने घरावर बसणे अशुभ समजतात. तसेच तंत्रविद्येसाठी त्यास बंदिस्त केले जाते. हे सर्व गैरसमज दूर करण्यासाठी व घुबडाचे निसर्ग साखळीतील महत्त्व समजावण्यासाठी समाज प्रबोधनाची गरज आहे. ईला फाउंडेशन सारख्या सामाजिक संस्था नियमितपणे 'घुबड महोत्सवाचे आयोजन करून घुबडाचे निसर्ग साखळीतील महत्त्व पटवून देत आहेत. तसेच काही व्यक्तीसुद्धा वेगवेगळ्या ठिकाणी व्याख्याने देऊन समाज प्रबोधनाचे काम करीत आहेत.

थायलंड सरकारच्या टपाल विभागातर्फे गव्हाणी घुबड, शृंगी घुबड, शिंगळा घुबड व जंगली पिंगळा या पक्ष्यांवर चार तिकिटांचा संच असलेले मिनियेचर शीट प्रकाशित केले आहे. घुबड हे निशाचर असल्याने ही तिकीट मिनीवर सीटना भूमीवर..

**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

*****

## पुस्तक परिचय ' पक्षी येती अंगणी '

पुस्तकाच्या ब्लर्बवर प्रसिद्ध लेखक राजन गवस यांनी त्याचा उल्लेख झपाटून टाकणारी कादंबरी असा केला असला तरी माझ्या मते हे लेखन म्हणजे एका निसर्गवेड्याने पशु-पक्षी, वृक्षवल्ली यांचा घेतलेला लेखनशोध आहे. त्यासाठी निसर्गप्रेमाने झपाटलेल्या लेखकाने दिवस-रात्र रानावनात, सागर संचारात टिपलेल्या आठवणींच्या नोंदी आहेत.

पुस्तकाचे शीर्षक 'पक्षी येती अंगणी' असे असले तरी पक्षी पाहण्यासाठी लेखक अंगण सोडून बाहेर अगणित ठिकाणी फिरला आहे. त्याची निरीक्षणे मार्मिक आहेत. तांबट पक्षी झाडावर घरट्यासाठी दोन छिद्रे कोरतो आणि वरच्या छिद्रातून आत शिरून खालच्या छिद्रातून पिलांना भरवत बाहेर येतो. घरट्यात शिरताना लालचुटूक वडफळे चोचीत असतात तर बाहेर येताना पिलांनी टाकलेला चोथा घेऊन येतो, असे सांगितले आहे.माझ्या अंगणात असलेल्या आंब्याची एक फांदी वठली आहे. त्यावर तांबटाचे कोरलेले छिद्र दिसत होते; पण एक दिवस मांजराने त्या छिद्राचा वेध घेण्याचा प्रयत्न केल्यावर तांबट पक्षी निघून गेला होता; पण काही दिवसांनी त्या छिद्राच्या थोड्या वरच्या जागी त्याने नवे छिद्र पाडले होते. ते मला दिसत होते. त्यावर या तांबटाला दुसरी जागा सापडली नाही का? असे म्हणत मी तिकडे दुर्लक्ष केले होते; पण त्याचा हा उद्योग का होता, हे मला कळले नव्हते. ते लेखकाने सांगितल्यावर उमगले.

श्री. माणिक पुरी यांनी लिहिलेले कोणतेही पान वाचले की, त्यांच्या डोळस निरीक्षणातील सूक्ष्मपणा जाणवतो. त्यांच्या आणखी नोंदी वाचायची उत्सुकता व्यक्त करून थांबतो.

**दिगंबर गाडगीळ**

पक्षी येती अंगणी
**लेखक :** श्री. माणिक पुरी **प्रकाशन :** दर्या प्रकाशन, पुणे-४६.
**पृष्ठे :** १३२ **मूल्य रुपये** २५०/-










Birds & Mammals **Sculpture**

Bird Calls **CDS**

Singing Bird **Clock**

# Wildlifekart.com

## Online Shop for Nature and Wildlife Lovers

wildlifekart@gmail.com 7400488996

- 1,000 + Birds and Wildlife related products
- 100 + Products categories
- Information of various Wildlife Resorts across India, Wildlife Tours and Wildlife News








Birds & Wiildlife **Tshirts**

Birds and Mammals **Lapel Pins**

Beautiful **Bird Nests**



# ADVENTURE HUB MH
# ECOTOURISM & ADVENTURE SPORTS

TENT CAMPING



WILDLIFE SAFARIS



ADVENTURE
HUB MH

CUSTOMIZE YOUR TRIP WITH US

ZIPLINE



RAPELLING



- SPECIAL DISCOUNTS ON -

FRIENDS GROUP, COLLEGE GROUPS, FAMILY GROUPS, OFFICE & INSTITUTIONAL GROUPS

MANISH DHAKULKAR - 9730354115 / 8805008803

## ॲसिक्लोफेनॅक गिधाडांसाठी तेवढेच घातक

गुरांसाठी वेदनाशामक डायक्लोफेनॅक जे जनावर मृत झाल्यावर त्यांची प्रेते गिधाडांनी खाल्ल्यावर त्यांच्यासाठी घातक ठरत होते. म्हणून त्यावर कालांतराने बंदी घालण्यात आली. त्यानंतर त्याची जागा ॲसिक्लोफेनॅकने घेतली. त्याचे रूपांतर डायक्लोफेनॅकमध्ये होत असल्याने तेही गिधाडांसाठी घातक ठरत आहे. त्यावरही बंदी आवश्यक आहे.

साभार पोच

**अनंतातील एक धूलीकण**

लेखक : श्री. अविनाश धोंडू शिरोडे

पुस्तक परिचय पुढील अंकी



**माहितीचा उजाळा उत्तरे :**

१) आशिष पित्ती
२) धुसर सुरय.
३) एँलेन ऑक्टेविअन ह्यूम
४) २२ जून
५) हिमालयातील कस्तूर
६) Edibleanest swiftlet (Aerodramus fuciphagus)
७) रानपाकोळी (Woodswallow)
८) नवरंग
९) शंकर
१०) इमू

Book Post

प्रती,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : गौरी एंटरप्राइजेस, नाशिक
मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन